**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ**
**ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही**
**कृषि हवामान सल्ला पत्रक**
**गोंदिया जिल्हा**

क्र.कृ.ह.स./९७/कृ.सं.के./८४५/२०२४ दिनांक ०३ डिसेंबर २०२४

| हवामान घटक | पुढील पाच दिवसाचा हवामान अंदाज दिनांक ०४ ते ०८ डिसेंबर २०२४ | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०४/१२/२०२४ | ०५/१२/२०२४ | ०६/१२/२०२४ | ०७/१२/२०२४ | ०८/१२/२०२४ |
| पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| कमाल तापमान (अं.से.) | २९.४ | ३०.७ | ३०.६ | ३०.५ | ३०.४ |
| किमान तापमान (अं.से.) | २०.२ | १९.७ | १८.५ | १७.८ | १६.९ |
| सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ८६ | ८४ | ५३ | ५७ | ५९ |
| दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ६६ | ५६ | ४२ | ३८ | ४१ |
| वा-याचा वेग (किमी/तास) | ६ | ५ | ५ | ६ | ५ |
| ढग स्थिती (आकाश) | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ |

| | | |
|---|---|---|
| हवामान अंदाज | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार गोंदिया जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसात ०४ ते ०८ डिसेंबर २०२४ रोजी आकाश आंशिक ढगाळ राहून कमाल तापमान २९.४ ते ३०.७ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १६.९ ते २०.२ अंश सेल्सिअस राहून कोरडे हवामान राहण्याची अधिक शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. | |

| पिकांचे नाव | पिकाची अवस्था | शेतकऱ्यांना हवामान आधारीत कृषी सल्ला |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | ➢ पुढील पाच दिवस कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता शेतकरी बंधूनी धान पिकांची मळणी राहिली असल्यास त्यांनी मळणी करून बियाणे सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ रब्बी पिके, फळबागा, भाजीपाला पिकामध्ये आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी इत्यादी.), कीड व रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणीची व उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे सुरु ठेवावीत. |
| गहु | पेरणी | ➢ बागायती उशिरा पेरणीसाठी पूर्णा, पीडीकेव्ही सरदार, एकेएडब्लू ४६२७ या वाणांचे हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे.<br>➢ पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा व्हिटावाक्स ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास या बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया केल्यानंतर त्या बियाण्यास अझाटोबॅक्टर २५० ग्रॅम व स्फुरद विरघडणारे जिवाणू खत (पि. एस. बी.) २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणे या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी.<br>➢ पेरणीच्या वेळी बियाणे ५ सें. मी. पेक्षा खोल पडणार नाही याची काळजी घावी. पेरणीसाठी दोन ओळीतील अंतर १५ ते १८ सें.मी. ठेवावे.<br>➢ पेरणीच्या वेळी नत्र स्फुरद पालाश ४० किलो प्रति हेक्टरी द्यावे. |
| | मुकूट मुळे फुटणे | ➢ वेळेवर पेरणी कलेल्या गहू पिकास पेरणीनंतर १८ ते २० दिवसानंतर मुकुट मुळे फुटण्याच्या अवस्थेत पहिले पाणी द्यावे. या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास ३३ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते.<br>➢ मर्यादित सिंचनाची उपलब्धता लक्षात ठेऊन, एकाच ओलिताची व्यवस्था असल्यास पेरणीनंतर ४२ दिवसांनी, दोन ओलिताची व्यवस्था असल्यास २१ व ६५ दिवसांनी व तीन ओलिताची व्यवस्था असल्यास २१, ४२ आणि ६५ दिवसांनी ओलीत करावे. |
| हरभरा | वाढीची अवस्था | ➢ हरभरा पिकाच्या पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी आवश्यकतेनुसार आंतरमशागतीची कामे करून पिक तणमुक्त ठेवावे त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे निंदणी करावी.<br>➢ घाटे अळीच्या एकात्मिक वेवस्थापणासाठी प्रती हेक्टरी २० पक्षी थांबे शेतामध्ये लावावे.<br>➢ घाटे अळीने आर्थिक नुकसानीची पातळी (१-२ प्रती मिटर ओळ किंवा ५ टक्के किडग्रस्त घाटे) पार केल्यास नियंत्रणासाठी पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती ५० मि.ली. किंवा एच.ए.एन.पि.व्ही. (१x१०$^{९}$) पिओबी/मिली) ५०० एल.ई/हे. किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के इसी २० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| जवस | वाढीची अवस्था | ➢ जवस पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी विरळणी करून २५ दिवसांनी डवरणी तसेच आवश्यकतेप्रमाणे निंदणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| करडी | वाढीची अवस्था | ➢ करडी पिकाच्या पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी विरळणी करून दोन रोपात २० ते ३० सें. मी. अंतर ठेवावे आवश्यकतेनुसार १ ते २ वेळा निंदणी व डवरणी करावी.<br>➢ मावा किडीचा प्रादुर्भाव (३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) आढळताच डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| मोहरी | वाढीची अवस्था | ➢ मोहरी पिकाच्या पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी विरळणी करून आवश्यकतेप्रमाणे निंदणी तसेच आंतरमशागतीची कामे करावी. |
| धान | लोंबी/ दाणे पक्क्वता | ➢ उशिरा कालावधीत येणाऱ्या धान पिक वाणांची भेसळ लोम्बी (लांबोर) काढून टाकावे.<br>➢ उशिरा कालावधीत येणाऱ्या धान पिकाची पक्वतेनुसार कापणी जमिनीलगत करावी.<br>➢ कापलेले पिक उन्हात वाळवल्यानंतर पेंढ्या बांधून मळणीसाठी खळ्यावर रचून ठेवावे व मळणी करावी मळणी केलेल्या मालाचे सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावे. |
| तूर | फुल व शेंगा अवस्था | ➢ तूर पिकात हेलीकोव्हर्पा अळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत.<br>➢ तूर पिकात पक्षी थांबे उभारावेत.<br>➢ ढगाळ वातावरणामुळे शेंगा पोखरणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी पिक ५० टक्के फुलावर आल्याबरोबर पहिली फवारणी क्विनॉलफॉस २५ टक्के इसी १६ मि.ली. त्यानंतर १५ दिवसांनी दुसरी फवारणी इमामेक्टिन बेन्झोएट ५ टक्के एसजी ३ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| मिरची | फुल ते फळ | ➢ ढगाळ वातावरणामुळे फुल किडे व कोळीच्या नियंत्रणासाठी ईमामेक्टीन बेनझाइट ५ टक्के ४ ग्रम प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| पशुपालन सल्ला | | ➢ जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोठ्यामध्ये/सुरक्षित ठिकाणी ठेवावे.  जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी ४ ते ६ इंच जाडीचे भाताचा पेंढा, गव्हाचा पेंढा, करावातीचे धूळ इत्यादीचे बेडिंग करावे. जनावरांच्या गोठ्याचा व जमिनीचा भाग कोरडा व स्वच्छ ठेवावा.<br>➢ जनावरांना पिण्यासाठी २४ तास स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांच्या पाण्याची कुंड/ साधने याची आठवड्यातून एकदा स्वच्छता करावी.<br>➢ रब्बी हंगामात घेणा-या पशुधनासाठी मका, ओट, बरशीम लसून घास व ज्वारी चारा पिकाची लागवड करावी. |
| कुक्कुटपालन सल्ला | | ➢ कुक्कुट्पालनामध्ये थंडीच्या दिवसात पक्षांना उबेची आवश्यकता जास्त असते म्हणुन पिवळ्या प्रकाशाच्या बल्बची संख्या किंवा आवश्यकतेनुसार जमिनीपासुन उंची बदलवत रहावी तसेच शेडला गोणपाट/पोत्यांचे पडदे लावून थंडीपासून संरक्षण करावे.<br>➢ कोंबड्यांच्या घरामध्ये हवा नेहमी खेळती असावी. थंड किंवा गरम हवेचा झोत सरळ त्यांच्यावर येऊ देऊ नये. |

➢ **हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी.**

शेतकरी बंधुनो सप्रेम नमस्कार, वर्ष २०२४ मधील ग्रामीण कृषि मौसम सेवा सल्ला पत्रक नोंदणीसाठी आपले नाव, गाव,पत्ता, मोबाईल नंबर इत्यादी माहिती ई-मेल aassindewahi@gmail.com किवा मोबाईल नंबर ९६२३३६०३२७ वर संपर्क साधावा.

**प्रकल्प समन्वयक**
**ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र,**
**सिंदेवाही जि. चंद्रपूर**